International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# महाराष्ट्र राज्यातील मानवाधिकाराच्या स्थितीचे चिकित्सक अध्ययन (कालखंड 2018-2020)

**प्रा. स्वप्नील म. रामटेके[1], डॉ. डी. डी. कोटुरवार[2]**
[1]*संशोधक*
[2]*मार्गदर्शक, प्राचार्य, श्रीमती सविताबाई उत्तमराव देशमुख महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ*
*Corresponding Author – प्रा. स्वप्नील म. रामटेके*
**DOI - 10.5281/zenodo.15251011**

**प्रस्तावना:**

मनुष्य हा प्राणी असल्यामुळे व्यक्ती ज्या हक्कांचा दावेदार ठरतो त्यास मानवी हक्क संबोधले जाते. मानवी हक्क संकल्पनेचे असे गृहीतक आहे की, सर्व मनुष्य मात्र हे समान आहेत, म्हणुन त्यांना प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्यासाठी काही समान हक्क उपलब्ध असले पाहिजेत.

अशाप्रकारे मानवी हक्क एखाद्या राज्यातील विशिष्ट प्रकारच्या राजकीय वा कायदेशीर चौकटीवर अवलंबून नसून स्वरूपतः वैश्वीक आहेत. त्यांचे स्वरूप अधिक व्यापक आहे. म्हणुनच जात, वंश, भाषा, वांकता, धर्म, संस्कृती आणि राष्ट्रीयता या आधारे व्यक्ती- व्यक्तींमध्ये भेदभाव न करता, व्यक्तीला आपल्या जीवित, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी काही हक्क उपलब्ध असले पाहिजेत. सर्व मानव समान आहेत, म्हणजे त्यांच्यात सद्सद्विवेकाची क्षमता आहे आणि जगातील सर्व मनुष्यांना काही समान मूलभूत गरजा असतात ज्या प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठापूर्वक व सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी पूर्ण कराव्या लागतात, या दोन पायाभूत गृहितकांवर मानवीहक्काची संकल्पना उभी आहे. प्रत्येक व्यक्ती चांगले काय? वाईट काय? याचा आपल्या क्षमतेनुसार निर्णय घेत असते. सर्व मानवामध्ये ही वैचारिक शक्ती आढळून येते. म्हणुन सर्व मानव समान आहेत अशी धारणा मांडण्यात आली. दुसऱ्या बाजूला सर्व मानवांना काही समान मूलभूत गरजा असतात. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक भौतिक गरजा, स्वतः अस्तीत्वाची व प्रतिष्ठापूर्वक जीवनाची हमी देण्यासाठी स्वावलंबी व स्वयंसेवी असण्याची आर्थिक गरज स्वभावतः सामाजिक प्राणी असल्याने निर्माण होणारी समुहाची गरज, शेवटी आत्मविकास, सर्वांगीण विकास व आपले अंतिम ध्येय साध्य करण्यासाठी 'मानसिक गरज' या सर्वांच्याच सामाईक गरजा असतात. हक्क विशेषतः 'मानवी हक्क' या सार्वधिक, मूलभूत मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी काही हक्कांची हमी देणे गरजेचे ठरते. अश्यारीतीने हक्क मानवाच्या सार्वत्रिक, मूलभूत गरजांतून उगम पावतात आणि 'वैश्विक मानवी हक्कांचे' रूप धारण आहे की मानव हा जन्मतः मुक्त आणि समान आहे, म्हणुन त्याला भेदभावरहित समान वर्तणुकीची हमी दिली पाहिजे. त्यामुळे 'समान वागणुक' आणि 'भेदभावाचा अभाव' या मानवी हक्क विचारातील दोन मूलभूत संकल्पना आहे.

**मानवाधिकाराचा अर्थ :**

मानवाधिकार म्हणजे प्रत्येक व्यक्ती ही मानव आहे आणि मानव असल्यामुळे निसर्गतः जे अधिकार प्राप्त होतात त्यांना मानवाधिकार असे म्हणतात.
प्रसिद्ध विचारवंत हेराल्ड लास्की यांच्या मते,

''ज्या परिस्थितीच्या घटकांशिवाय व्यक्तीला आपली सर्वांगीण प्रगती साध्य करता येत नाही, त्या परिस्थितींच्या घटकांना मानवाधिकार असे म्हणतात.''
प्रसिध्द राजकीय विचारवंत बेन्थम यांच्या मते,

''कायद्याने मान्य केलेली स्वीकृती दिलेली व्यक्तीची मागणी म्हणजे अधिकार होय.''

राज्यांद्वारे मान्यता प्राप्त अधिकारांचा 'मूलभूत अधिकार' म्हणून राज्यघटनेत समावेश करण्याची प्रथा अठराव्या शतकाच्या अखेरीस रूढ झाली. मूलभूत अधिकारांना व्यापक आणि सार्वत्रिक स्वरूप देण्याच्या उद्देश्याने त्यांचा उल्लेख मानवी अधिकार म्हणून करण्यास विसाव्या शतकात प्रारंभ झाला.

**मानवाधिकाराच्या व्याख्या :**

''जगातील प्रत्येक व्यक्तीला ती मानव आहे, या एकाच कारणास्तव ज्या अधिकारांची प्राप्ती होणे गरजेचे असते, त्या अधिकारांना मानवाधिकार असे म्हणतात.''
इ.स. 1913 च्या मानवाधिकार संरक्षण अधिनियमात केलेली व्याख्या -

''मानवाधिकार म्हणजे व्यक्तीचे जीवित, स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठा यासंबंधीचे, सांविधानिक संरक्षण बहाल केलेले आणि मानवाधिकाराच्या जागतिक जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात आलेले आणि भारतीय न्यायव्यवस्थेद्वारा ज्यांची जोपासना करण्यात येते, ते अधिकार होय.''
युनोच्या जाहीरनाम्यातील कलम क्र. 2 नुसार :

''वंश, वर्ण, भाषा, धर्म, राष्ट्र, लिंग, मालमत्ता क्षेत्रात जन्मल्यामुळे मिळणारी प्रतिष्ठा व दर्जा इत्यादी बाबतीत कोणताही भेदभाव न करता सर्व विशिष्ट मानवास जे समान अधिकार व स्वातंत्र्य दिले जाते, त्यास मानवी हक्क असे म्हणतात.''

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (MSHRC) :**

''महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना 15-01-2000 रोजी मानवी हक्क अधिनियम 1993 च्या कलम 21(1) अंतर्गत ठराव क्र.1099/378/ पोल क्र. 14 नुसार करण्यात आली. MSHRC मानवी हक्कांचा आदर करते. हे मानवी हक्कांचा प्रचार, संरक्षण आणि अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण, माहिती आणि प्रसिद्धीचा वापर करते.

मानवी हक्क संरक्षण कायद्याचे अधिनियम 2 (1) (d) अंतर्गत मानवी हक्कांना घटनेने हमी दिली आहे किंवा आंतरराष्ट्रीय करारांमध्ये मूर्त स्वरूप दिले आणि भारतातील न्यायालयाद्वारे लागू करण्यायोग्य व्यक्तींचे जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेशी संबंधित अधिकार म्हणून परिभाषित करते.''

**निवड समितीची रचना :**

1. या समितीत अध्यक्ष त्या राज्यांचे मुख्यमंत्री असतात.
2. तर सदस्य म्हणून विधानसभेचे सभापती व विरोधी पक्ष नेता तसेच राज्याचे गृहमंत्री असतात. विधानपरिषद असल्यास सभापती व विरोधी पक्ष नेता सदस्य असतात.

**राज्य मानवाधिकार आयोगाची रचना :**

1. उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश
2. उच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा माजी न्यायाधीश , 7 वर्ष अनुभव असलेले जिल्हा न्यायाधीश
3. दोन सदस्य हे मानवी हक्कासंबंधी ज्ञान व प्रत्यक्ष कार्याचा अनुभव असलेले पाहिजेत.
4. सचिवपदी म्हणजेच आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून भारतीय प्रशासन सेवेतील जेष्ठ अधिकारी.

**अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल :**

''पाच वर्षाचा किंवा वयाची 70 वर्ष पूर्ण होइपर्यंत यापैकी जो अगोदर असेल तो पर्यंत कार्यकाल हेच अध्यक्ष व सदस्य पुर्ननियुक्तीसाठी पात्र असतील.''

**आयोगाचे कार्ये व अधिकार :**

1. ‘‘राज्य मानवी हक्क आयोगाला आपल्या राज्यांमध्ये होणाऱ्या मानवी हक्क भंगाचा घटनांची चौकशी करण्याचा अधिकार आहे.
2. राज्य शासनाच्या अख्यारित येणाऱ्या विषयांशी संबंधित घडणाऱ्या मानवी हक्क भंगाच्या घटनांची चौकशी करण्याचा अधिकार आहे.
3. समाजाच्या विविध स्तरामध्ये मानवी हक्कासंबंधी जाणीव जागृती करणे.
4. राज्यातील मानवी हक्क उल्लंघनासंबंधी सर्व घटकांचा आढावा घेऊन त्याबाबत उपाय सुचविणे.
5. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी व जाणीव-जागृतीकरीता काम करणाऱ्या बिगर शासकीय संस्था, संघटना यांना प्रोत्साहन देणे.
6. राज्य सरकारी कर्मचाऱ्याकडून घडलेले मानवी हक्क भंग, त्याबाबतच्या तक्रारी, यांना यासाठी मदत केली असल्यास अथवा मानवी हक्क भंग रोखण्यास आवश्यक कारवाई केली नसल्यास त्यांची चौकशी करणे.

**संशोधनाची उद्दिष्ट :**

1. महाराष्ट्र राज्यातील मानवाधिकाराची स्थिती जाणून घेणे
2. MSHRC ची सन 2018-2020 ते 19-.आकडेवारी जाणून घेणे 2021

**संशोधनाची गृहीतकृते :**

1. 2018- 19ते2020 - 2021मध्ये महाराष्ट्र राज्यात मानवाधिकाराच्या तक्रारीची अनेक प्रकरणे प्रलंबित दिसून येईल.
2. महाराष्ट्र राज्यात मानवाधिकाराच्या तक्रारींच्या प्रकरणामध्ये वाढ झालेली दिसून येईल.

**महाराष्ट्र राज्यातील मानवाधिकाराची स्थिती:**

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे RTI कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी माहिती मागवली असता त्यांना असे आढळून आले कि, कर्मचाऱ्याकडून 51 रिक्त जागेमुळे आयोग ठप्प झाला आहे आणि 3 कोर्टरूम्स इंस्टा फायरमध्ये इंधन भरत आहे. द यंग व्हिसलब्लोअर्स इंस्टा फाऊंडेशनचे सदस्य कार्तिक जानी माहितीच्या अधिकारातंर्गत सांगण्यात आले की, 54 पदांपैकी 28 पदे ही रिक्त आहे. त्यामुळे ही पदे त्वरित भरण्यात यावी जेणेकरून आयोग पुर्ण क्षमतेने काम करू शकेल आणि विलंब न करता न्याय मिळू शकेल.

MSHRC प्रगती अहवालाचा तपशीलवार अभ्यास केल्यानंतर 2003- 04 पासुन 2011-12 पर्यंत ज्या प्रकरणांमध्ये मदत देण्यात आली त्याची एकूण संख्या 2,012 आहे आणि 2013-14 पासून 2020 पर्यंत फक्त 258 प्रकरणे आहे. याचा अर्थ 2014 नंतर मानवी हक्क उल्लंघनाच्या प्रकरणांचा आलेख वाढू लागला आहे. त्या तुलनेत दिलासा मात्र खूपच कमी प्रकरणांमध्ये मिळाला आहे. मागील काही वर्षाची आकडेवारी लक्षात घेतली असता राज्यातील मानवाधिकाराची स्थिती लक्षात येते.

1 जानेवारी 2018 ते 31 डिसेंबर 2018 पर्यंत आयोगाला एकूण 6770 तक्रारी प्राप्त झाल्या. खालील तक्ता क्र. 4.5 मध्ये प्राप्त झालेल्या ताज्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे तसेच निकालात काढण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या तपशीलवार दर्शवली आहे.

**तक्ता क्र. 1:** MSHRC चा 01/01/2018 ते 31/12/2018 चा प्रगती अहवालाचा डेटा

| पुर्वीची पेंडन्सी | ताजे आकडे | एकूण प्रकरणे | वर्षभरातील निकाली प्रकरणे | एकूण दिलासा | प्रलंबीत प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|
| 15555 | 6770 | 22325 | 5368 | 41 | 16957 |

(स्रोतः MSHRC चा सन 2018 ते 2019 प्रगती अहवाल)

MSHRC चा 01/01/2018 ते 31/12/2018 प्रगती अहवालाचा डेटा दर्शविते कि, या वर्षात पुर्वीची पेंडन्सीचे 15555 प्रकरणे असून आयोगात नव्याने 6770 दाखल झाली आहे. त्यामुळे एकूण प्रकरणांची संख्या 22325 इतकी झाली आहे.

**आलेख क्र. 1:** MSHRC चा प्रगती अहवाल 2018-19 चा आलेख




(स्रोत - तक्ता क्र. 1)

याच कालावधीत वर्षभरयात 5368 प्रकरणे निकाली निघाले असून एकूण 41 प्रकरणांमध्ये दिलासा मिळाला असून 16957 प्रकरणे प्रलंबीत आहे.

1 जानेवारी 2019 ते 31 डिसेंबर 2019 पर्यंत आयोगाला एकूण 4659 तक्रारी प्राप्त झाल्या. खालील तक्ता क्र. 4.6 मध्ये प्राप्त झालेल्या ताज्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे तसेच निकालात काढण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या तपशीलवार दर्शवली आहे.

**तक्ता क्र. 2:** MSHRC चा 01/01/2019 ते 31/12/2019 चा प्रगती अहवाल

| पुर्वीची पेंडन्सी | ताजे आकडे | एकूण प्रकरणे | वर्षभरातील निकाली प्रकरणे | एकूण दिलासा | प्रलंबीत प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|
| 16957 | 4659 | 21616 | 3559 | 57 | 18057 |

(स्रोतः MSHRC चा सन 2019 ते 2020 प्रगती अहवाल)

MSHRC चा 01/01/2019 ते 31/12/2019 प्रगती अहवालाचा डेटा दर्शविते कि, या वर्षात पुर्वीची पेंडन्सीचे 16,957 प्रकरणे असून आयोगात नव्याने 4659 दाखल झाली आहे. त्यामुळे एकूण प्रकरणांची संख्या 21,616 इतकी झाली आहे.

**आलेख क्र. 2**




(स्त्रोत - तक्ता क्र. 2)

याच कालावधीत वर्षभरायात 3559 प्रकरणे निकाली निघाले असून एकूण 57 प्रकरणांमध्ये दिलासा मिळाला असून 18,057 प्रकरणे प्रलंबीत आहे.

1 जानेवारी 2020 ते 31 डिसेंबर 2020 पर्यंत आयोगाला एकूण 3763 तक्रारी प्राप्त झाल्या. खालील तक्ता क्र. 4.7 मध्ये प्राप्त झालेल्या ताज्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे तसेच निकालात काढण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या तपशीलवार दर्शवली आहे .

**तक्ता क्र. 3:** MSHRC चा 01/01/2020 ते 31/12/2020 चा प्रगती अहवाल

| पुर्वीची पेंडन्सी | ताजे आकडे | एकूण प्रकरणे | वर्षभरातील निकाली प्रकरणे | एकूण दिलासा | प्रलंबीत प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|
| 18087 | 3763 | 21820 | 1083 | 15 | 20737 |

(स्त्रोतः MSHRC चा सन 2020 ते 2021 प्रगती अहवाल)

MSHRC चा 01/01/2020 ते 31/12/2020 प्रगती अहवालाचा डेटा दर्शविते कि, या वर्षात पुर्वीची पेंडन्सीचे 18,087 प्रकरणे असून आयोगात नव्याने 3763 दाखल झाली आहे. त्यामुळे एकूण प्रकरणांची संख्या 21,830 इतकी झाली आहे.

**आलेख क्र. 3:** MSHRC चा प्रगती अहवाल 2020-21 चा आलेख




(स्रोत - तक्ता क्र. 3)

याच कालावधीत वर्षभरात 1083 प्रकरणे निकाली निघाले असून एकूण 15 प्रकरणांमध्ये दिलासा मिळाला असून 20,737 प्रकरणे प्रलंबीत आहे.

वरील अहवालावरून लक्षात येते की राज्य मानवधिकाराकडे दाखल प्रलंबित प्रकरणांची संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**निष्कर्ष :**

1. महाराष्ट्र राज्यात मानवाधिकाराच्या तक्रारींचे अनेक प्रकरणे प्रलंबित दिसून येत आहे.
2. महाराष्ट्र राज्यात राज्य मानवाधिकार आयोगाकडे पदे रिक्त असल्यामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे आढळून आले.

**शिफारसी :**

1. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगातील रिक्त पदाची पुर्तता करावी
2. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने केलेल्या सूचनेनुसार जिल्हा तक्रार प्राधिकरणाची स्थापना करणे.
3. MSHRC ने मानवाधिकारांच्या तक्रारीचे निपटारा जलद गतीने करण्याचा प्रयत्न करावा

**संदर्भ सूची :**

1. Amartya Sen (1999) “Development as Freedom” United states by Anchor Books,
2. A.G. Noorani, “Constitutional Questions & Citizens Rights’’ (Oxford University Press, New Delhi ,2006).
3. चौधरी दशरथ कुमार, ‘‘भारतीय संस्कृती में मानवाधिकार की धारणाएँ’’, कला प्रकाशन, वाराणसी, 2020
4. डॉ.सी .जोहरी जे ., ‘‘भारत का संविधान एवं मानवाधिकार’’, एस.डी.पी.बी., पब्लिकेषन, 2022
5. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग प्रगती अहवाल सन 2018- 19
6. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग प्रगती अहवाल सन 2019-20
7. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग प्रगती अहवाल सन 2020-21